**श्रीवर्धन नगरपरिषद, श्रीवर्धन**

**जाहिर ई-निविदा सूचना क्र. ई-०६/२०२६-२७**

श्रीवर्धन नगरपरिषदेकडील जाहिर ई-निविदा सूचना क्र. ई-०६/२०२६-२७ अन्वये महाराष्ट्र शासन सा. बां. अथवा तत्सम विभागाकडील नोंदणीकृत ठेकेदार / मजूर सहकारी संस्था यांचेकडून खालील कामाकरिता ऑनलाईन पद्धतीने निविदा मागवित आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदेची रक्कम | निविदा फॉर्म फी | इसारा रक्कम | सुरक्षा अनामत रक्कम | | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | रोखीने | बिलातून | |
| १) | श्रीवर्धन नगरपरिषद शाळा क्र. ७ चे पहिल्या मजल्याचे काम करणे. | ४८८७८२८.०० | १००००.०० | ४८८८०.०० | १९५५१५.०० | ५.००टक्के | १२० दिवस |

उपरोक्त ई-निविदा बाबत फॉर्म ची विक्री, स्विकृती व निविदा उघडण्याची कार्यवाही खालीलप्रमाणे राहील.

१) निविदा प्रसिध्दी दिनांक १३/०५/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता.

२) निविदा फॉर्म ऑनलाईन उपलब्ध दिनांक १३/०५/२०२६ रोजी सकाळी ११.०० पासून ते दिनांक २७/०५/२०२६ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत.

३) निविदा फॉर्म ऑनलाईन स्विकृती दिनांक १३/०५/२०२६ रोजी सकाळी ११.०० पासून ते दिनांक २७/०५/२०२६ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत.

४) निविदा बिड-१ (ऑनलाईन) उघडण्यास दिनांक २८/०५/२०२६ रोजी दुपारी १.०० वाजलेपासून सुरुवात करणेत येईल.

निविदेतील सर्व कामांची तांत्रिक बिड परिपूर्ण झालेनंतर आर्थिक बिड डघडणेची कार्यवाही सुरु केली जाईल. त्यावेळी संबंधित निविदाकार यांनी उपस्थित राहणे बंधनकारक राहील. अन्यथा निविदांबाबत कोणतीही तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

**अटी व शर्ती**

१) कामासाठी लागणारे सर्व साहित्य व उपकरणे ठेकेदाराने स्वतःची वापरायची आहे.

२) अटी अगर शर्तीची निविदा स्विकारली जाणार नाही.

३) इच्छुक निविदाकार यांनी तांत्रिक बिडसोबत निविदा फॉर्म फी व इसारा रक्कम भरलेची पावती, विवरणपत्र अ, ब, क, नोंदणीपत्रके, जीएसटी, ईपीएफ नोंदणी प्रमाणपत्र, वर्गीकरण प्रमाणपत्र, आयकर विवरणपत्रे अथवा बॅलन्स शीट, इ. नमूद केलेली कागदपत्रे ऑनलाईन सादर करावयाची आहेत.

४) कामाच्या डिफेक्ट लायबिलिटीज् बद्दल वरीलप्रमाणे इसारा रक्कम आणि सुरक्षा अनामत रक्कम भरणा करणेची आहे. डिफेक्ट लायबिलिटीज्चा कालावधी २४ महिने इतका राहील.

५) ज्याचे नावे निविदा मंजूर होईल त्याने योग्य ती स्टॅम्प ड्युटी भरुन करारनामा करुन देणेचा आहे. निविदा सूचना व करारनामा हा निविदेचाच एक भाग असेल.

६) कामासाठी लागणारे साहित्य स्पेसिफिकेशनप्रमाणे व अंदाजपत्रकामध्ये नमूद केलेल्या मान्यताप्राप्त कंपन्यांचे वापरणे ठेकेदारास बंधनकारक राहिल.

७) कामासाठी अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराची निविदा सादर करणाऱ्या ठेकेदाराने आर्थिक बिड उघडणेची कार्यवाही झाल्यानंतर कमाल ८ दिवसांत आवश्यक तेवढी अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम धनाकर्षाद्वारे अथवा रोखीने नगरपरिषदेकडे जमा करणे आवश्यक राहील.

८) काम मंजूर झालेल्या ठेकेदाराची इसारा रक्कम, सुरक्षा अनामत रक्कम म्हणून गृहित धरली जाईल.

९) शासनाचे नियमानुसार प्रत्येक ठेकेदाराकडे ईपीएफ व ईएसआयसी नंबर असणे बंधनकारक राहील. कामगार कायद्याप्रमाणे लागु असलेली प्रचलित नियमांची अंमलबजावणी संबंधीत ठेकेदाराने करणे बंधनकारक राहील.

१०) निधीच्या उपलब्धतेनुसार कामाची देयके अदा करणेत येतील. त्याचप्रमाणे प्रत्यक्षात कामाचे जागेवर साहित्य बसवून, तपासणी झालेनंतर आणि कार्यान्वयन झाल्यानंतर ते योग्य झाल्याची खात्री झाली तरच देयक अदा करणेत येईल. कोणत्याही परिस्थितीत भाववाढीचे कलम लागु होणार नाही.

११) यापुर्वी श्रीवर्धन नगरपरिषदेने ज्या ठेका कंपनींना अथवा त्यांचेशी संबंधित व्यक्तिंना निविदा न देण्याचा निर्णय घेतला आहे, अशा ठेका कंपनींना अथवा त्यांचेशी संबंधित व्यक्तिंना नगरपरिषदेकडे प्राप्त निविदांमध्ये कोणत्याही ठेकेदाराचे प्रतिनिधीत्व करता येणार नाही. त्याचप्रमाणे यापुर्वी ठेकेदाराने काम न केल्यामुळे श्रीवर्धन नगरपरिषदेकडील कामांचे ठेके रद्द केले आहेत किंवा ठेकेदाराची अनामत रक्कम जप्त करणेत आली आहे, अशा ठेकेदारांची निविदा ग्राह्य धरली जाणार नाही.

१२) कोणतीही निविदा स्विकारणे, नाकारणे अथवा सर्व निविदा नाकारणेचे अधिकार श्रीवर्धन नगरपरिषदेने राखून ठेवले आहेत.

क्र.श्रीनप/बांध/कात-२/०२३६/२०२६-२७
श्रीवर्धन नगरपरिषद कार्यालय, श्रीवर्धन
जि. रायगड, दिनांक १२/०५/२०२६

(विराज लबडे)
प्रभारी मुख्याधिकारी
श्रीवर्धन नगरपरिषद

(Important Note: Above mentioned Tender Notice is in 'DV-TTShridhar' font. If you are unable to read the content, please install "ISM Devnagari" software cum fonts and then try again to read this.)

Signature Not Verified
Digitally signed by VIRAJ ATMARAM LABDE
Date: 2026.05.12 21:35:31 IST
Location: Maharashtra-MH